# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
## (बृहन्मुंबई महानगरपालिका)

**शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये आय.टी.आय. उत्तीर्ण / आय.टी.आय. परीक्षेस बसणारे उमेदवार, उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) उत्तीर्ण उमेदवार व एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांकडून ऑगस्ट २०१६ भरतीसत्रासाठी प्रशिक्षणार्थी या पदाकरिता अर्ज मागवण्याबाबत**

बेस्ट उपक्रम त्यांच्या परिवहन अभियांत्रिकी विभागात शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये यांत्रिकी (मोटार वाहन), मोटार वाहन विजतंत्री, जोडारी, कातारी, सांधाता , मोटार वाहन उभारणीकार, व यांत्रिकी मोटरगाडी (पेट्रोल।डिझेल इंजिन) या व्यवसायांकरीता आय.टी.आय. उत्तीर्ण झालेले उमेदवार व आय.टी.आय. परीक्षेस बसणारे उमेदवार, जोडारी, कातारी, सांधाता व यांत्रिकी (मोटार वाहन) या व्यवसायाकरीता, मेकॅनिकल टेक्नॉलॉजी व ऑटो इंजिनियरींग टेक्नीशिअन हे विषय घेवून उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) उत्तीर्ण उमेदवार यांच्याकडून, त्याच प्रमाणे यांत्रिकी (मोटार वाहन) व मोटार वाहन विजतंत्री या व्यवसायाकरीता एस.एस.सी. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून व विद्युत पुरवठा विभागात यांत्रिक प्रशितन व वातानुकूलन व तारखंड जोडणीदार या व्यवसायाकरीता एस.एस.सी. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडून तसेच विजतंत्री, तारतंत्री, तारखंड जोडणीदार व यांत्रिकी (एच टी।एल टी) या व्यवसायांकरीता आय.टी.आय. उत्तीर्ण झालेले उमेदवार व आय.टी.आय. परीक्षेस बसणारे उमेदवारांकडून ऑगस्ट २०१६ या सत्राकरीता प्रशिक्षणार्थी पदासाठी अर्ज मागवित आहे.

### अर्हताः आय.टी.आय. उत्तीर्ण /आय.टी.आय. परीक्षेस बसणा-या उमेदवारांकरीता

शालांत परीक्षेत गणित व शास्त्र विषयासह उत्तीर्ण + संबंधित व्यवसायातील आय.टी.आय. प्रशिक्षण पूर्ण करुन अंतिम व्यवसाय चाचणी उत्तीर्ण झालेला असावा. मोटार वाहन उभारणीकार या व्यवसायासाठी शालांत परीक्षेत गणित व शास्त्र विषयासह उत्तीर्ण + फोर्जर आणि हिट ट्रीटर किंवा धातुपत्रा कारागीर या व्यवसायातील आय.टी.आय. प्रशिक्षण पूर्ण करुन अंतिम व्यवसाय चाचणी उत्तीर्ण झालेला असावा. तारखंड जोडणीदार या व्यवसायांकरीता शालांत परीक्षेत गणित व शास्त्र विषयासह उत्तीर्ण + तारतंत्री या व्यवसायातील आय.टी.आय. प्रशिक्षण पूर्ण करुन अंतिम व्यवसाय चाचणी उत्तीर्ण झालेला असावा. तसेच मोटार वाहन विजतंत्री या व्यवसायासाठी शालांत परीक्षेत गणित व शास्त्र विषयासह उत्तीर्ण + यांत्रिकी (मोटार वाहन) किंवा विजतंत्री या व्यवसायातील आय.टी.आय. प्रशिक्षण पूर्ण करुन अंतिम व्यवसाय चाचणी उत्तीर्ण झालेला असावा. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून जुलै २०१६च्या अंतिम व्यवसाय चाचणीस बसणा-या उमेदवारांचे अर्ज देखील स्वीकारले जातील, परंतू अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांना नेमणूकीपुर्वी अंतिम चाचणी उत्तीर्ण झाल्याचा दाखला/प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

### उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) उत्तीर्ण उमेदवारां करीता

जोडारी, कातारी, सांधाता व यांत्रिकी (मोटार वाहन) या पदाकरीता मेकॅनिकल टेक्नॉलॉजी व ऑटो इंजिनियरींग टेक्नीशिअन हे विषय घेवून उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) उत्तीर्ण असावा.

### एस.एस.सी. उत्तीर्ण उमेदवारांकरीता

शालांत परीक्षेत गणित व शास्त्र विषयासह किमान ५०% गुण (६५०।६०० पैकी) मिळवून उत्तीर्ण झालेला असावा. मागासवर्गीय अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील उमेदवारांकरिता शालांत परीक्षेच्या गुणांत ५% सूट (किमान ४५% गुण).

कृपया मागे पहा...

**इतर आवश्यकताः** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा.

**वयः** २.८.२०१६ रोजी आय.टी.आय./उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) उत्तीर्ण उमेदवारांकरीता १७ ते २२ वर्षे व एस.एस.सी. उत्तीर्ण उमेदवारांकरीता १५ ते २० वर्षे. जे उमेदवार मागील विद्यावर्षात संबंधित परीक्षांमध्ये (शालांत परीक्षा।आयटीआय परीक्षा।उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) नुकतेच उत्तीर्ण झाले असतील त्यांच्या साठी वयाची उच्चतम मर्यादा नसेल

**प्रशिक्षणः कालावधी** आय.टी.आय./उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) उत्तीर्ण उमेदवारांकरीता ६ महिने, १ ते २ वर्षे आणि एस.एस.सी. उत्तीर्ण उमेदवारांकरीता २ ते ३ वर्षे (नेमून दिलेल्या व्यवसायानुसार).

**विद्यावेतनः** शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये

प्रशिक्षण कालावधी पूर्ण करुन व्यवसाय परीक्षा उत्तीर्ण होणा-या प्रशिक्षणार्थींना कोणत्याही प्रकारची नोकरी देणे उपक्रमावर बंधनकारक नसेल.

निवडलेल्या उमेदवारांना प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी करार करावा लागेल. शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये मागासवर्गीय अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरीता व माजी सैनिकांच्या मुलांसाठी काही जागा राखीव आहेत. सदर मागासवर्गीय उमेदवारांनी सक्षम अधिका-यांकडून प्राप्त केलेल्या आपल्या जातीच्या दाखल्याची प्रमाणित झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे तसेच माजी सैनिकांच्या मुलांनी आपले वडील माजी सैनिक असल्याच्या दाखल्याची प्रमाणित झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

वरील अर्हता पूर्ण करणा-या आय.टी.आय. उत्तीर्ण उमेदवारांनी शालांत परीक्षेची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला व आय.टी.आय. परीक्षेची गुणपत्रिका, उच्च माध्यमिक परीक्षा (किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम) उत्तीर्ण उमेदवारांनी उच्च माध्यमिक परीक्षेची गुणपत्रिका आणि एस.एस.सी. उत्तीर्ण उमेदवारांनी एस.एस.सी. परीक्षेची गुणपत्रिका व शाळा सोडल्याचा दाखला दाखवून, विहित अर्ज रुपये २५ /- शुल्क देवून, कार्यकारी अभियंता परिवहन (प्रशिक्षण) यांच्या तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ येथील कार्यालयातून, (दि.०७.०६.२०१६ पासून २४.०६.२०१६ पर्यंत) सोमवार ते शुक्रवार या कामाच्या दिवशी सकाळी १० ते १२ व दुपारी १.३० ते ३.३० या वेळेत घेवून जावा. तसेच उमेदवारांनी सदर अर्ज बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com या संकेत स्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन रित्या सादर करावयाचे आहेत. अर्ज ऑनलाईन सादर करण्याची सविस्तर कार्यपद्धती मुख्य पृष्ठावरील "Guidelines" या विकल्पांतर्गत उपलब्ध आहे. ऑन लाईन <u>अर्ज स्वीकारण्याचा कालावधी दि.१५.०६.२०१६ ते २५.०६.२०१६.</u>

इतर तपशीलवार माहिती, अर्ज वितरीत करण्याच्या वेळी तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, वडाळा येथील सूचना फलकावर लावण्यात येईल.

अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख <u>२५ जून २०१६</u> आहे. त्या संबंधी कोणतीही माहीती अथवा अर्ज पत्र व्यवहाराद्वारे दिला अगर स्वीकारला जाणार नाही तसेच प्रवास वा इतर कोणत्याही प्रकारचा खर्च उपक्रमाकडून मिळणार नाही.

**महाव्यवस्थापक**